क्विक हिल फाउंडेशन, थिएटर ॲकेडमी आणि महाराष्ट्र सायबर पोलीस यांचा संयुक्त उपक्रम

# साय-फाय करंडक एकांकिकेमधून सायबर सुरक्षा जनजागृती

## थिएटर ॲकेडमी आणि महाराष्ट्र सायबर पोलिसांचा संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातून प्रवेशिकांची मागणी

। मुंबई ✍ प्रतिनिधी।

**मुंबईत** सायबर गुन्हे मोठ्या प्रमाणात घडू लागले आहेत. त्याला वेळच्या वेळी आळा बसणे फार आवश्यक आहे. सर्वात जास्त गुन्हे हे नागरिकांच्या अज्ञानामुळे घडत असतात. त्यामुळे सायबर गुन्ह्यांना मोठ्या प्रमाणात पेव फुटले आहेत. त्यासाठीच क्विक हील फाऊंडेशन, थिएटर अकॅडेमी आणि महाराष्ट्र सायबर पोलीस यांचा संयुक्त उपक्रम साय-फाय करंडकसाठी महाराष्ट्र राज्यातून प्रवेशिका मागवण्यात आल्या आहेत. साय-फाय करंडक ही एक एकांकिका स्पर्धा आहे, जिचा उद्देश तत्कालीन थिएटरच्या माध्यमातून सायबर सुरक्षेबाबत जागरूकता पसरवणे हा आहे. कॉलेज, स्वतंत्र गट आणि थिएटर संस्थांकडून प्रवेशिका १५ नोव्हेंबर २०१८ पर्यंत स्वीकारण्यात येतील. सहभागी टीम नाट्य वर्तुळातील नोंदणीकृत गट असणे अनिवार्य आहे. साय-फाय करंडक २०१८ मध्ये नोंदणी करण्यासाठी ८३९००४१३९ / ९६५७४४२९५७ या क्रमांकावर फोन करा किंवा theatreacademypunegmail.com ला मेल करा. अधिक माहितीसाठी www.cyfiarts.com या संकेतस्थळाला भेट दिल्यास संपूर्ण माहिती मिळणार आहे.



### नावीन्यपूर्ण प्रयोगातून जनजागृती

**साय-फाय** करंडक २०१७च्या पहिल्या आवृत्तीत १०० पेक्षा अधिक टीमनी सहभाग नोंदवत ही स्पर्धा यशस्वी केली होती. थिएटर अकॅडेमी आपले अध्यक्ष आणि सुप्रसिद्ध नाट्यकर्मी प्रसाद पुरंदरे यांच्या तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील कान्या-कोपऱ्यातून आलेल्या प्रादेशिक केंद्रांच्या टीम्सची निवड करेल. या टीम अशा समकालीन विचारप्रवण एकांकिका सादर करतील, ज्यांमध्ये डिजिटल दुनियेत आजच्या जीवनाचे प्रतिबिंब दिसत असेल. साय-फाय करंडकाच्या माध्यमातून क्विक हील फाऊंडेशन आणि महाराष्ट्र राज्य पोलिसची सायबर सुरक्षा जागरूकता आणण्यासाठी नावीन्यपूर्ण प्रयोग करून एक सुरक्षित सायबर विश्व उभे करण्याची वचनबद्धता व्यक्त होते. साय-फाय करंडक २०१८ मध्ये अंतिम फेरीसाठी निवड झालेल्या एकांकिका १६ डिसेंबर २०१८ रोजी ग्रँड फिनालेमध्ये सादर होतील व त्यावेळी या कलाकारांना नाटक, सिनेमा आणि टीव्हीवरील मान्यवर कलाकारांच्या ज्यूरी पॅनलसमोर आपली कला सादर करण्याची संधी मिळेल.

### एकांकिकेतून धोक्यांचे प्रशिक्षण

**क्विक** हील टेक्नॉलॉजिज लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी कैलाश काटकर म्हणाले, २०१८ च्या या एकांकिकांच्या स्पर्धात्मक उत्सवासाठी आम्ही महाराष्ट्र राज्य पोलिस आणि थिएटर ॲकेडमीशी सहयोग केला आहे, जे या उत्सवातील सर्व प्रक्रियांमध्ये सहाय्य करतील. या वर्षी आम्ही महाराष्ट्रातील अधिक व्यापक क्षेत्रांतून प्रवेशिका मागवल्या आहेत ज्यामुळे ठिकठिकाणचे नाट्य कलाकार आणि विविध विषय सामील होऊ शकतील. आम्हाला खात्री आहे की, या उत्सवामुळे सहज प्राप्य आणि सुखद अशा डिजिटल विश्वाशी संबंधित धोके लोकांच्या ध्यानात येतील.